अतितात्काळ/कालमर्यादा/महत्वाचे

क्र.पोमसं/३१/२२३५/ठेसंवियो/२०२२-२०२३/ २२७/२०२१ मुंबई दि २७/०२/२०२३

**संदर्भ** - शासन निर्णय गृहविभाग क्र. बीयुडी०६२२/प्र.क्र. ११३/आस्था-१/ दि १३/०१/२०२३

**विषय-लेखा अनुदान २०२०-२०२१**
मागणी क्र. बी-६, मुख्य लेखाशिर्ष २२३५,
सामाजिक सुरक्षा व कल्याण,
१०४ ठेव संलग्न विमा योजना.

* * * * *

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय, गृह विभाग निर्णयान्वये वित्तीय वर्ष सन २०२२-२०२३ करिता मागणी क्र. बी-०६, मुख्यलेखाशिर्ष "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण" १०४- ठेव संलग्न विमा योजने अंतर्गत मृत शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्या वारसदारांना अनुदान मंजूर करण्याकरिता शासनाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना रु १,०५,००,०००/-(अक्षरी रु. एक कोटी पाच लाख फक्त) इतका निधी चिन्हांकित करुन स्वतंत्रपणे अर्थसंकल्पीय संगणकीय वितरण प्रणालीद्वारे (BDS) वाटपासाठी प्रत्यक्ष दि ०९/०२/२०२३ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने चिन्हांकित करुन दिलेला आणि अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवरील अखर्चित शिल्लक असलेला रु १,०५,००,०००/-(अक्षरी रु. एक कोटी पाच लाख फक्त) इतक्या निधीमधून या कार्यालयाच्या प्रतीक्षायादीवरील १७५ मृत अधिकारी/ कर्मचा-यांच्या वारसदारांना सोबत जोडलेल्या यादीनुसार रु १,०५,००,०००/-(अक्षरी रु. एक कोटी पाच लाख फक्त) अनुदान मंजुर करण्यात येत आहे. ठेव संलग्न विमा योजनेअंतर्गत अनुदान मंजुरीचे प्राधिकार क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले असल्यामुळे, खालील नमुद घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांचे अनुदान मंजूरीचे आदेश तात्काळ निर्गमित करुन त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

३. शासनाने सदर शासन निर्णयान्वये चिन्हांकित करुन दिलेला निधी दि ३१/०३/२०२३ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत खर्च होणे आवश्यक आहे. सदर निधीचा विनियोग पुर्णत: न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात याची कृपया नोंद घ्यावी. तरी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची अचूक देयके सादर करावीत व ती देयके कोणत्याही परिस्थितीत दि ३१/०३/२०२३ पूर्वी पारित करुन घ्यावीत. तसेच, संबंधित मृत अधिकारी/कर्मचा-यांच्या वारसदारांना रक्कम अदा करणे ही, सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमखाची असल्यामुळे, सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणी स्वत: लक्ष देऊन, त्यांचे कार्यालयातील लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचा-यांना त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपुर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात, जेणेकरुन शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीचा विनियोग पुर्णत: होईल. संबंधित वारसदारांना अनुदान अदा केल्यानंतर त्यांची दिनांकित अदा रोल पावती देयकाच्या कोषागार प्रमाणकपत्र क्रमांक दिनांकासह शासनास व महालेखापाल-१, मुंबई /महालेखापाल-२, नागपूर तसेच या कार्यालयास दिनांक १०/०४/२०२३ पूर्वी न चुकता सादर करावी.

४. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ, महालेखापाल यांचे तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहीत मुदतीत पाठविण्यात यावी. त्यानुसार शासनाने चिन्हांकित करुन दिलेल्या निधीनुसार, या कार्यालयाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या खर्चाबाबतचा ताळमेळ संबंधित कोषागार कार्यालय व महालेखापाल यांचे कार्यालयातील नोंदविलेल्या खर्चाशी करुन खर्चमेळाची प्रमाणित माहिती दिनांक १०/०४/२०२३ पुर्वी महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपुर्ण जबाबदारी ही क्षेत्रीय कार्यालय प्रमुखांची राहील त्याप्रमाणे माहिती न पाठविणा-या कार्यालयातील संबंधितावर जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करणे भाग

पडेल याची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्विकारण्यात येणार नाही व या कारणामुळे विलंब झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/ कार्यालय प्रमुखांची राहील.

५. तसेच सदरचा खर्च हा सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षातील, गृह विभाग, मागणी क्र. बी-६ मुख्यालेखाशिर्ष "२२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण" गौणशिर्ष-१०४ ठेव संलग्न विमा योजना (सांकेतिक क्रमांक २२३५१६८४) या लेखाशिर्षाखली खर्ची टाकण्यात यावा व तो वित्तीय वर्ष २०२२-२०२३ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच सदरचा खर्च हा याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

**(टिप- मागील आदेशामधील काही काराणास्तव अनुदान व्यपगंत झाल्यामुळे या कार्यालयाच्या दि २९/१२/२०१९ व दि २८/०३/२०२२ रोजीच्या आदेशातील अनुक्रमांक ४ ते १०,१२,१३,२७,३३,३८ व ४८ वर नमुद मयत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वारसदारांना अनुदानाचे वाटप करण्यात आलेले नाही. तरी त्याची नावे पुन्हा आदेशामध्ये घेण्यात आली आहेत. )**

**(अनुप कुमार सिंह)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई

पोलीस आयुक्त, नवी मुंबई/ठाणे शहर/ पुणे शहर/नाशिक शहर/सोलापूर शहर/लोहमार्ग मुंबई/नागपूर शहर/अमरावती शहर/औरंगाबाद शहर/

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

पोलीस अधीक्षक, लातुर/सातारा/अकोला/चंद्रपूर/जळगांव/गोंदिया/यवतमाळ/गडचिरोली/रायगड/धुळे/ नांदेड/पालघर/अहमदनगर/रत्नागिरी/बुलढाणा/जालना/हिंगोली/अमरावती ग्रामीण/ नागपूर ग्रामीण/लोह. पुणे/लोह. नागपूर/बीड/नाशिक ग्रामीण/औरंगाबाद ग्रामीण/नाशिक ग्रामीण उस्मानाबाद/सांगली/सोलापूर ग्रामीण/ठाणे ग्रामीण/लोह. औरंगाबाद/कोल्हापूर/वाशिम

समादेशक, रा. रा. पो. बल. गट क्र. १ पुणे/३ जालना/१२ हिंगोली/६ धुळे

**निधी वितरण २०२२-२३.**
मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४- ठेव संलग्न विमा योजना.

पो. म. सं. म. रा. मुंबई
6
A-2300 4281
18 JAN 2023
31
आवक क्रमांक

**महाराष्ट्र शासन**
गृह विभाग
शासन निर्णय क्र.- बीयुडी ०६२२/प्र.क्र.११३/आस्था-१
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जानेवारी, २०२३.

**संदर्भ** :- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थ-२०२२/प्र. क्र.४३/अर्थ-३, दि.४/४/२०२२.
२) शासन निर्णय क्र.- बीयुडी ०६२२/प्र.क्र.११३/आस्था-१ दि.२०/६/२०२२ .

**प्रस्तावना :-**

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी गृह विभागाच्या "मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४-ठेव संलग्न विमा योजना" या अंतर्गत रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ शासन परिपत्रान्वये माहे डिसेंबर २०२२ पर्यंत मंजूर तरतूदीच्या ६०% इतकी रक्कम टप्प्याटप्प्याने वितरीत करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर तरतुदीमधील रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) या अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी सद्यस्थितीत रु. १,२७,६०,०००/- (रु. एक कोटी सत्तावीस लक्ष साठ हजार फक्त) इतका निधी (सुमारे २१%) वित विभागाकडून संगणकीय प्रणालीद्वारे (बीम्स) वितरीत करण्यात आला आहे.

संदर्भ क्र.२ दि.२०/६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये उक्त लेखाशिर्षाखाली एकूण अर्थसंकल्पिय तरतुदीपैकी २१% निधी यापुर्वी वितरीत करण्यात आला आहे. शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थ-२०२२/प्र. क्र.४३/अर्थ-३, दि.४/४/२०२२ अन्वये सध्यस्थितीत वितरीत केलेला निधी विभागाच्या अखत्यारीतील कार्यालयांना सन २०२२-२३ साठी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्तनुसार सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी "मागणी क्र. बी-६, मुख्यलेखाशिर्ष-२२३५१६८४, सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०४- ठेव संलग्न विमा योजना" अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतूद रक्कम रु. ६,०७,४०,०००/- (रु. सहा कोटी सात लक्ष चाळीस हजार फक्त) या मंजूर निधीतून अर्थसंकल्पीय तरतुदीच्या २१% निधी गृह (खुद्द) व इतर अधिनस्थ क्षेत्रीय कार्यालयांना वितरीत करण्यात येत असून वितरणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-